# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- २९/११/२०१८

## जन्मठेपेचे शिक्षेतील फरार कैद्यास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने औरंगाबाद जिल्हयातुन केले जेरबंद

---

नाशिक जिल्हयातील पोलीस ठाणेनिहाय दाखल असलेले गुन्हयांमधील फरार व पाहिजे असलेले आरोपी, फेरअटक आरोपी तसेच जिल्हा मध्यवर्ती कारागृहातुन पॅरोल व संचित रजेवरुन फरार असलेले फारारबंदी यांचा शोध घेवुन त्यांना अटक करणेसाठी **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शनाखाली विशेष मोहिम राबविली जात आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांनी त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना फरार आरोपी व कैद्यांचे नातेवाईक, मित्र मंडळी, पोलीस मित्र व खब-यांच्या मदतीने सविस्तर माहिती घेणेबाबत सुचना दिलेल्या आहे.

सन २०११ मध्ये सिन्नर पोलीस ठाणेस गुरनं. २५२/२०११ भादवि कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल होता, सदर गुन्हयात जन्मठेपेची शिक्षा झालेला फरारबंदी नामे **अमोल एकनाथ गंगावणे, वय २८, रा. मुसळगाव, ता.सिन्नर** याने सिन्नर एम.आय.डी.सी.परिसरात एका परप्रांतीय इसमाचा खुन केला होता. सन २०१३ मध्ये सदर खटल्यात मा. जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी अमोल गंगावणे यास दोषी ठरवुन जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती, त्यानंतर सदर आरोपीताची मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली. दरम्यान जन्मठेपेची शिक्षा भोगत असतांना दिनांक २१ मार्च २०१५ मध्ये **नमुद कैदी अमोल गंगावणे** हा **मध्यवर्ती कारागृह** नाशिकरोड येथुन **संचित रजेवर सुटला** होता. संचित रजेवर सुटल्यानंतर नियत कालावधीत जेलमध्ये परत हजर न होता सदर कैदी हा फरार झाला होता. सदर बाबत सिन्नर पोलीस ठाणे ॥ गुरनं ४४/२०१५ भादवि कलम २२४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, सन २०१५ मध्ये संचित रजेवर सुटल्यापासुन सदर कैदी हा आपले अस्तित्व लपवुन अज्ञात स्थळी निघुन गेला होता. दरम्यान गत काही दिवसांपासुन सदर कैद्याचे वास्तव्याबाबत उपयुक्त माहिती मिळालेवरुन **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांचे पथकाने सदर कैद्याचा कसोशिने शोध सुरु केला. फरार कैदी अमोल गंगावणे याचे नातेवाईक, मित्रमंडळी तसेच त्याचे परजिल्हयातील नातेवाईक यांचेबाबत उपयुक्त माहिती मिळवुन त्याचे सध्याचे वास्तव्याबाबत गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती घेतली. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास सीमावर्ती जिल्हयांमध्ये रवाना केले, दरम्यान काल दिनांक २८ नोव्हेंबर रोजी मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे फरार कैदी अमोल गंगावणे हा औरंगाबाद शहरात असल्याचे समजलेवरुन स्थागुशाचे पथकाने त्यास वाळुंज एम.आय.डी.सी. येथुन एका कंपनीतुन ताब्यात घेतले आहे.

**फरार कैदी अमोल गंगावणे** यांचे शोधार्थ रवाना करण्यात आलेले स्थागुशाचे पथक सुमारे ०३ दिवसांपासुन औरंगाबाद शहरात दबा धरून बसले होते, औरंगाबाद जिल्हयातील एम.आय.डी.सी. परिसरातील विविध वस्त्या तसेच भाडेतत्वावर रहिवासी वसाहतींमध्ये सदर कैद्याचा तपास करण्यात आला, त्यावरून तो वाळुंज एम.आय.डी.सी. लगतच वळदगावा मध्ये भाडयाने खोली घेवुन राहत असुन एका कंपनीत कामाला असल्याचे समजले होते. सदर कैदी अमोल गंगावणे हा गुन्हा फरार झालेपासुन मुंबई, नाशिक, औरंगाबाद जिल्हयातील विविध ठिकाणांवर आपले अस्तित्व व नाव लपवुन राहत होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांचे मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पथकाने अत्यंत चिकाटीने सदर आरोपीचा मागोवा घेवुन त्यास औरंगाबाद जिल्हयातील वाळुंज एम.आय.डी.सी. परिससरातील कंपनीमधुन ताब्यात घेतले आहे. ताब्यात घेतलेला फरार कैदी **अमोल एकनाथ गंगावणे, वय २८, रा.मुसळगाव, ता. सिन्नर** यास वरील गुन्हयाचे पुढील तपासकामी **सिन्नर पोलीसांचे ताब्यात देण्यात** आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. नीलोत्पल सो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे** पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे**, सहा.पोलीस निरीक्षक **श्री.आशिष आडसुळ,** पोहवा प्रकाश चव्हाणके, रविंद्र वानखेडे, दिलीप घुले, पोना प्रितम लोखंडे, पोकॉ गोकुळ सांगळे, निलेश कातकाडे, किरण काकड, संदिप लगड यांचे पथकाने **सुमारे ०३ वर्षांपासुन फरार असलेल्या कैदयास औरंगाबाद जिल्हयातुन** ताब्यात घेऊन कामगिरी केली आहे.